वादीतर्फे सा.क्र.१ हजर

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>

८. ले आऊट व ६६ बाय १२० जागेचा ८अ चा उतारा मी दाखल करु शकत नाही. रु.२५,०००/- चा गहाणखताचा दस्त माझ्याकडे असून तो मी दाखल करु शकतो. मी प्रतिवादीला वकीलामार्फत पाठवलेल्या नोटीसची प्रत दाखल करु शकतो. सदर गहाणखत २००२ सालचे आहे. सदर गहाणखत २००२ साली झाले आहे याबाबतचा उल्लेख दाव्यामध्ये केलेला नाही, याबाबत मी काही सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१६५ हा गावठाणालगत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सदर कालावधीत गट क्र.१६५ मध्ये लोकवस्ती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, ६६ बाय ६६ जागेच्या आजुबाजूची जागा पुर्वी खुली होती.

९. मी जगन्नाथ भिमराव सुरवसे यांना ५० वर्षापुर्वी पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ६६ बाय ६६ जागेवर जगन्नाथ सुरवसे यांचा १९४२ पासून ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गुणाबाई हिच्या ताब्यात ६६ बाय ६६ जागा कधीही नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जागा जगन्नाथ सुरवसे यांच्या ताब्यात होती व त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ च्या ताब्यात होती. हे म्हणणे खरे नाही की, २००२ साली सदर जागेला प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नाव लागावे म्हणून मी संमत्ती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जागेवर पुर्वी जगन्नाथ सुरवसे यांचा ताबा होता व गुणाबाई यांचा ताबा कधीही नव्हता म्हणून मी प्रतिवादी क्र.१ व २ यांना त्याचे नाव लागावे म्हणून संमत्ती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ८अ च्या उताऱ्याला २००२ पासून जगन्नाथ सुरवसेचे नाव लागलेले आहे. २००२ पासून आजतागायत मी प्रतिवादीच्या नावाच्या नोंदीला आक्षेप घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जगन्नाथ सुरवसे याने १९४२ साली गुणाबाईच्या मिळकतीवर अतिक्रमण केले व सदर अतिक्रमण आजतागायत कायम आहे. सदर अतिक्रमण गुणाबाई ही काढू शकत नसल्यामुळे तिने माझ्या वडीलांशी चर्चा करुन नाममात्र खरेदीखत करुन त्याच्या हक्कात करुन दिले होते, याबाबत मला माहिती नाही. जगन्नाथ सुरवसे यांच्या कुटूंबाकडे ८ एकर जमीन होती व २००२ मध्ये १२ ते १४ एकर जमीन होती, परंतु ते कधीही सावकारी करत नव्हते व आजही करत नाहीत, याबाबत मला माहिती नाही. मधुकर जगन्नाथ सुरवसे यांनी बाबु सुरवसे यांना ६६ बाय ६६ जागेचे खरेदीखत करुन दिले, याबाबत मला माहिती नाही.

१०. व्यंकट वसंतराव सुरवसे यांच्या दाव्याविषयी मला कधी माहिती झाली हे मला आठवत नाही. माझे प्रतिवादी क्र.३ व्यंकटसोबत कोणतीही तक्रार नाही. व्यंकटने प्रतिवादी क्र.१ मधुकरविरुध्द २०१४ मध्ये दावा दिला होता, याबाबत मला माहिती होती. व्यंकट व मधुकरचे भांडण कधीपासून आहे याबाबत मला माहिती नाही. ६६ बाय ६६ जागेपैकी ३३ बाय ३३ जागेसंदर्भात व्यंकट व मधुकर यांच्यामध्ये खरेदीची व्यवहार झाल्याचे मला प्रतिवादी क्र.३ ने सांगितले होते.

**प्रश्नः** मधुकरने बाबुच्या हक्कात ३३ बाय ३३ जागेचे करुन दिलेले खरेदीखत व मधुकर व व्यंकट यांच्यामध्ये झालेला खरेदीचा व्यवहार या एकाच मिळकतीसंदर्भात आहेत का?
**उत्तरः** दोन्ही व्यवहार हे ६६ बाय ६६ जागेसंदर्भात होते.

नियमित दिवाणी दावा क्र.५०७/२०१८
नि.क्र.२४/ क (सोबत)

सदर ६६ बाय ६६ जागेपैकी १ इंच देखील जागा प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात नाही, याबाबत मी काही सांगू शकत नाही. मी सदर प्रकरणात व्यंकटला प्रतिवादी का केले याबाबत मी काही सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ६६ बाय ६६ जागेवर माझा कधीही ताबा नव्हता. सदर मिळकत प्रतिवादीच्या ताब्यात कधी गेली त्याची तारीख मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीमध्ये माझा कसलाही हक्कसंबंधन नसताना व्यंकट सुरवसे यांच्याशी संगनमत करुन मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.३ चे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.04.18 16:37:30 +0530

दि.१८/०४/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.